Re-accredited by NAAC(2014)
With CGPA-3.16

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

सर्व संलग्निंत महाविद्यालयाच्या प्राचार्य/प्राचार्या/संचालक यांना कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत घेतल्या जाणा-या मार्च/एप्रिल, २०१६ या सत्रातील सर्व परीक्षांचे निकाल विहीत वेळेत जाहिर होण्याकरीता खालील सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी ही विनंती.

१. मा. प्राचार्य यांनी नियमित शिक्षकांना प्रात्यक्षिक परीक्षा वगळता महाविद्यालयाच्या कामातून(क. पर्यवेक्षक व इतर ) कार्यमुक्त करून तात्काळ आपल्या जिल्हयांशी संलग्नीत मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर मूल्यांकनाच्या कामासाठी प्रधान्यांने पाठविण्यात यावे.

२. आपल्या महाविद्यालयातील परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर पाठविल्यापासून जास्तीत जास्त १० दिवसात मूल्यांकनाचे कामकाज पूर्ण करून घेण्याची जबाबदारी आपण व्यक्तीशः घ्यावी. आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना कार्यरत रजेवर मूल्यमापन कामासाठी पाठवावे. आपल्या महाविद्यालयातील उत्तरपत्रिकेच्या संख्येच्या प्रमाणात संबधित शिक्षकांनी मुल्यमापन कामी सहकार्य करावे. तसेच ३२ (५) यादी व्यतीरिक्त इतर पात्र प्राध्यापकांना उत्तरपत्रिका तपासणी करीता पाठवावे व तशी यादी परीक्षक नियुक्ती विभागाकडे पाठवावी.

३. परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामी जे शिक्षक टाळाटाळ करतील अशा शिक्षकांची नांवे परीक्षा नियुक्ती विभागास कळविण्यात यावीत, जेणेकरून त्यांच्यावर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील ३२ (५) ग प्रमाणे नियमानुसार कारवाई करणे शक्य होईल.

४. मूल्यांकनाचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयातील परीक्षक/परीनिरीक्षक यांनी केलेल्या मूल्यांकनाच्या कामकाजाची तपशीलवार (विषय, मूल्यांकन केलेल्या उत्तरपत्रिका संख्या, एकूण किती दिवस कॅप सेंटरवर काम केले इ. ) माहिती मध्यवर्ती मूल्यमापन विभाग, परीक्षा भवन क्रं. २, शिवाजी विद्यापीठ यांचेकडे पाठविण्यात यावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

श्री. एम. ए. काकडे
(परीक्षा नियंत्रक)

जा.क्रं. शि.वि./ममुके/कॅप/७४ दि. ०६/०४/२०१६